**NOTICE** is hereby given that pursuant to Section 108 and 110 and other applicable provisions, if any, of the Companies Act, 2013("Act") (including any statutory modification(s) or re-enactment(s) thereof for the time being in force) read with Rule 20 and Rule 22 of the Companies (Management and Administration) Rules, 2014 (including any statutory modification(s) or re-enactment(s) thereof for the time being in force) ("Rules"), Regulation 44 of the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("Listing Regulations"), General Circular Nos. 14/2020 dated April 8, 2020, and 17/2020 dated April 13, 2020, read with other relevant circulars, including General Circular Nos. 10/2021 dated June 23, 2021, and 20/2021 dated December 8, 2021, issued by the Ministry of Corporate Affairs, Government of India ("MCA Circulars"), Secretarial Standard on General Meetings ("SS-2") issued by the Institute of Company Secretaries of India and any other applicable law, rules and regulations (including any statutory modification(s) or re-enactment(s) thereof for the time being in force), for seeking the approval of the Members of Innovassynth Investments Limitedto transact the business as set out in the Postal Ballot Notice ("Postal Ballot Notice"), by passing the said resolutions through Postal Ballot, only by way of remote e-voting process.

The Board of Directors of your Company has appointed Mr Miket Shashikant Bahuva (Membership No. FCS 7651), of Miket S. Bahuva and Co., Practicing Company Secretaries, Mumbai as the Scrutinizer to conduct the Postal Ballot and e-voting process.

The Company has engaged the services of National Securities Depository Limited ("NSDL"), for the purpose of providing a remote e-voting facility to its members. The remote e-voting shall commence on Saturday, April 9, 2022, at 9:00 A.M. (IST) and shall end on Sunday, May 8, 2022, at 5:00 P.M. (IST). The remote e-voting module shall be disabled by NSDL thereafter.Once the vote on a resolution is cast bythe Member, he/she shall not be allowed to change it subsequently or cast vote again.

Notice will also be available on the website of the Company i.e., www.innovassynthinvestments.in and the website of National Securities Depository Limited ("NSDL"), www.evoting.nsdl.com and on the website or the stock exchange, where the shares of the Company are listed, namely the BSE Limited at www.bseindia.com.

The Postal Ballot Notice is being sent by e-mail only to those eligible Members who have already registered their e-mail address with the Depositories / their depository participant / the Company's Registrar and Share Transfer Agents as of Monday 4th April 2022 is the cut-off date.

The results of the Postal Ballot and e-voting shall be announced on or before Tuesday, 10th May 2022. The said results would be made available on the Notice Board at the Registered Office of the Company, intimated to the BSE Limited where the shares of the Company are listed. Additionally, the results will also be uploaded on the Company's website www.innovassynthinvestments.in and on the website of National Securities Depository Limited (NSDL) www.evoting.nsdl.com.The Scrutinizer's decision on the validity of the Postal Ballot shall be final.

In case of any queries, members may refer to the Frequently Asked Questions (FAQs) for Shareholders and e-Voting user manual for Shareholders available at the download section of www.evoting.nsdl.com or call on toll-free no.: 1800 1020 990 /1800 224 430 or send a request at evoting@nsdl.co.in.

By Order of the Board of Directors
For **Innovassynth Investments Limited**
Sameer Pakhali
Chief financial officer & Company secretary
ACS 55746

Date:6th April 2022
Place: Khopoli

# स्वत:चे अपयश लपवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न : विश्वास पाठक

**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी):** ''महाराष्ट्रावर ऐन उन्हाळ्यात भारनियमनाचे संकट निर्माण झाले आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत राज्यावरील भारनियमन करावे लागणार असल्याची भीती ऊर्जामंत्री नितीन राऊत यांनी गुरुवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत व्यक्त केली, तर महाराष्ट्रावरचे लोडशेडिंगचे संकट टाळण्याचे प्रयत्न करू,'' अशी माहिती नितीन राऊत यांनी बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना दिली. मात्र, ऊर्जामंत्री स्वतःच अपयश लपवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप भाजपने केला आहे.



नितीन राऊत म्हणाले की, ''कोळशाचा साठा मुबलक उपलब्ध नाही. त्यामुळे प्लांट चालवणे जिकिरीचे झाले आहे. प्रत्येक प्लांट चालला पाहिजे, हा आमचा प्रयत्न आहे. एखाद्या वेळी कोळसा उपलब्ध झाला, तर रेल्वेचे रॅक उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे, दररोज लागणारा कोळसा कमी पडतो. म्हणून, जेव्हा उष्णांक वाढतो, तेव्हा ट्रान्सफॉर्मरही बंद पडण्याची भीती असते. त्यामुळे जेव्हा उष्णांक वाढतो, तेव्हा ट्रान्सफॉर्मरला कुलिंग द्यावी लागते. तेथे सबस्टेशनमध्ये आम्ही कुलर्स लावतो. एखाद्या वेळी पाण्याचा फवाराही मारावा लागतो, अशा वेळी वीज जास्त लागते आणि कधी कधी भारनियमन करावे लागते. राज्यात कोळशाची टंचाई असताना 'हायड्रोपॉवर' प्रकल्प असलेल्या कोयना धरणात १७ 'टीएमसी' पाणी उपलब्ध आहे. दररोजच्या वीजनिर्मितीसाठी एक 'टीएमसी' पाणी लागते. म्हणजेच १७ दिवसाचाच साठा आहे. आज राज्यातले तसेच देशातील वीजनिर्मिती प्रकल्प अडचणीत आले आहेत. त्यामुळे वीज विकत घ्यायला गेलो तरीही वीज विकत मिळत नाही. त्यामुळे भारनियमन होण्याची संभावना वाढलेली असते. तरीही नागरिकांवर भारनियमनाचे संकट ओढवू नये, याची आम्ही पुरेपुर काळजी घेऊ.''

**कोळसा कंपन्यांना पैसे देत नाहीत**

मात्र, ऊर्जामंत्र्यांच्या या वक्तव्याचा समाचार घेत ऊर्जा विषयातील अभ्यासक विश्वास पाठक यांनी नितीन राऊत यांच्यावर टीका केली. पाठक म्हणाले की, ''ऊर्जामंत्री नितीन राऊत यांचे वक्तव्य मी ऐकले. त्यांनी आत्तापासूनच काहीतरी कारण शोधून स्वतःच अपयश लपवण्याचा त्यांचा प्रयत्न दिसतो. ते म्हणत आहेत की, विजेची मागणी वाढते आहे, ट्रान्सफॉर्मर ट्रिप होतील, लोडशेडिंग करावे लागेल. कोळसा आम्हाला मिळत नाही, पाण्याचा आम्हाला प्रॉब्लेम आहे, अशा रितीने सर्व लंगडी समर्थन करणारी वक्तव्ये त्यांनी केलेली आहेत. एप्रिल, मे आणि जून महिन्यात वीजेची मागणी वाढतेच, यात कोणते रॉकेट सायन्स आहे, ती मागणी पूर्ण करण्यासाठी नियोजन करावे लागते. याच नियोजन यांनी केले का, ज्याप्रकारे गेल्यावर्षी कोळसा उत्पादक कंपन्यांनी राज्य सरकारला स्मरण पत्र दिले होते. त्याचपद्धतीने जानेवारी महिन्यातही दिले होते की, तुम्ही कोळसा उचला. मग राज्य सरकार कोळशाचा साठा का करत नाही? कोळशाचा साठा करत नाहीत, या कोळसा कंपन्यांना पैसे देत नाहीत. वीजेचे नियोजन चुकले आहे. 'इनकॉम्पीडेन्ट डायरेक्टर' लोकांना तिकडे बसवल्याने कंपन्यांचे मेंटेनन्स होत नाही. त्यामुळे, भविष्यात येणाऱ्या अपयशाची चाहूल या सरकारला लागली आहे. म्हणून अशी वक्तव्ये येत आहेत,'' असा थेट आरोप विश्वास पाठक यांनी केला.

### ३ पक्षांच्या अंतर्गत वादामुळे ऊर्जा मंत्रालयाचे खोळंबले १८ हजार कोटी



" महाविकास आघाडीमधील तीन पक्षांतील अंतर्गतवादाचा फटका महाराष्ट्रातील जनतेला बसतो आहे. विद्युत निर्मितीसाठी कोळशाचा पुरवठा करणाऱ्या कंपन्यांची बिले मोठ्या प्रमाणात रखडली असून, ऊर्जा मंत्रालयाचा तब्बल १८ हजार कोटींचा निधी प्रलंबित आहे. महाराष्ट्र लोडशेडींग मुक्त करण्याचा संकल्प दि. १२ डिसेंबर, २०१२ रोजी तत्कालीन महाराष्ट्र सरकारने केला होता. परंतु, त्यांना जमले नाही. त्यानंतर विधान सभेचे विरोधी पक्षनेते आणि माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने विविध योजना राबवत राज्याला लोडशेडींगमुक्त केले. आता केवळ अंतर्गत वादामुळे महाराष्ट्र होरपळतो आहे. महावितरणचे नियोजन पूर्णतः गडबडले आहे. ग्रामीण भाग तासनतास वीज नाही. परिणामी उद्योग संकटात सापडले आहेत. पूर्व विदर्भासह राज्यात पिकविल्या जाणाऱ्या धानाला वेळेत पाणी मिळणे गरजेचे आहे. परंतु, तासनतास वीजपुरवठा खंडित होत असल्याने पूर्व विदर्भासह राज्यातील धानाचे पीक संकटात सापडण्याची शक्यता आहे. भंडाऱ्यातील त्रस्त लोक थेट महावितरण कार्यालयावर धडकले. हा रोष राज्यात पसरायला वेळ लागणार नाही.

– **चंद्रशेखर बावनकुळे,** माजी उर्जामंत्री, आमदार, भाजप

# अवैधता आढळून आलेले प्रलंबित १२३ प्रस्ताव नामंजूर करा

## आ. नितेश राणेंचे मुंबई महापालिका आयुक्तांना पत्र

**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी):** ''यशवंत जाधव यांच्या स्थायी समिती अध्यक्ष पदाच्या कार्यकाळात अवैधता आढळून आलेले प्रलंबित १२३ प्रस्ताव नामंजूर करावे,'' अशी मागणी भाजप आमदार नितेश राणे यांनी मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक इकबालसिंह चहल यांना पत्र लिहून केली आहे.

नितेश राणे पत्रात म्हणाले आहेत की, ''मुंबई महापालिकेतील निवडून आलेल्या नगरसेवकांचा कालावधी दि. ७ मार्च रोजी संपुष्टात आला. त्यामुळे महापालिका बरखास्त झाली आहे. महापालिका संपुष्टात आल्याने यापूर्वीच्या स्थायी समितीच्या पटलावर ठेवण्यात आलेले परंतु, समिती अध्यक्ष यशवंत जाधव आणि त्यांचे कामकाज पाहाणारे विमल अगरवाल यांची कंत्राटदारांशी बोलणी फिस्कटल्याने काही प्रस्ताव विचारात घेतलेले नाही, असे एकूण १२३ प्रस्ताव होते. सदरचे प्रस्ताव मंजूर करणे, हे आता प्रशासकाच्या अखत्यारित आहेत. तथापि, आपण यावर ठोस निर्णय घेताना दिसणार नाही.



भाजपने नालेसफाईच्या कामांबाबत तीव्र टीका केल्यानंतर आपण २५ दिवसांनी नालेसफाई आणि चर बुजवण्याच्या कामांचे प्रस्ताव संमत केले. त्यानंतर बुधवार, दि. ६ एप्रिल रोजी आठ प्रस्तावांना मान्यता दिल्याची माहिती मिळत आहे.''

**भ्रष्टाचारी सेनेचा आपल्यावर दबाव तर नाही ना?**

''आपण स्वत: आयुक्त आहात आणि प्रशासकही आपणच आहात. स्थायी समितीने बोलणी फिस्कटलेले प्रस्ताव आपण निवडक पद्धतीने मंजूर करत आहात. त्यामुळे मागे सत्तेत असणाऱ्या भ्रष्टाचारी सेनेचा आपल्यावर दबाव तर नाही ना, अशी आमची धारणा होत आहे आणि तरीही काही निवडक प्रस्तावांनाच आपण मान्यता देण्याच्या आपल्या कार्यपद्धतीमुळे आपली प्रतिमासुद्धा मलीन होत आहे. आपल्याला प्रलंबित १२३ प्रस्तावांमध्ये अवैधता आढळत असेल, तर आपण संपूर्णपणे त्याला नामंजूर करावे. परंतु, कुठल्या परिस्थितीत निवडक प्रस्तावांना मान्यता देऊन मागील सत्ताधारी सेनेच्या भ्रष्टाचाराला साजेल, अशी पुरक कार्यपद्धती अवलंबू नये,'' अशी मागणीही नितेश राणेंनी पत्राद्वारे केली आहे.

# मुंबईतील 'एक्स ई' तथ्यहीन : आरोग्य मंत्रालय

**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) :** ''मुंबईत सापडलेला 'एक्स ई' 'व्हायरस'मध्ये काहीही तथ्य नाही,'' असे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने नुकतेच स्पष्ट केले. '' 'एक्स ई' 'व्हायरस'चा उपप्रकार आढळल्याच्या अहवालानंतर काही तासांनंतर मंत्रालयाने हे स्पष्टीकरण दिले. सध्याचे पुरावे नव्या 'एक्स ई' प्रकारात कोणतीही लक्षणे सूचित करत नाहीत,'' अशीही माहिती मंत्रालयाने दिली.

''नमुन्याच्या संदर्भात, ज्याला 'एक्स ई' 'व्हेरिएंट' असल्याचे म्हटले जात आहे, त्याचे जिनोमिक तज्ज्ञांनी तपशीलवार विश्लेषण केले आहे. या प्रकाराची जिनोमिक रचना 'एक्स ई' प्रकाराच्या जिनोमिकशी संबंधित नाही,'' असे आरोग्य मंत्रालयाने स्पष्ट केले.

''ज्या व्यक्तीची चाचणी 'पॉझिटिव्ह' आली आहे, ती पूर्णपणे लसीकरण झालेली ५० वर्षांची महिला आहे. त्यांच्यामध्ये 'एक्स ई'ची लक्षणे आढळली नाहीत. ती १० फेब्रुवारी रोजी दक्षिण आफ्रिकेतून आली होती आणि त्यांचा आरोग्यासंबंधी पूर्वेतिहास नव्हता. रुग्णालयात पोहोचल्यानंतर त्यांच्यातील 'व्हायरस'ची चाचणी 'निगेटिव्ह' आली आहे,'' असे आरोग्य मंत्रालयाने म्हटले आहे.

## थोडक्यात

### रक्तदान क्षेत्रातील उल्लेखनीय संस्थांना राज्यपालांच्या हस्ते 'संवेदना पुरस्कार'




**मुंबई :** गेल्या दोन वर्षांत रक्तदान क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या राज्यातील ३५ संस्थाना तसेच आरोग्यदूतांना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते राजभवन येथे नुकतेच 'संवेदना आंतरराष्ट्रीय जीवन रक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आले. 'नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन' (निमा) या संस्थेने तसेच, संस्थेशी निगडित आयुर्वेद डॉक्टरांनी रक्तदानाच्या बाबतीत राज्यात उत्कृष्ट काम केल्याचे राज्यपालांनी सांगितले. 'संवेदना पुरस्कार' वितरण सोहळ्याचे आयोजन 'नॅशनल इंटिग्रेटेड फोरम ऑफ आर्टिस्ट्स अँड ॲक्टिविस्ट्स' (निफा) या संस्थेने 'महाराष्ट्र आंत्रप्रेन्यूअर चेंबर' या संस्थेच्या सहकार्याने केले होते. कार्यक्रमाला 'निफा'चे संस्थापक प्रितपाल पनू, महाराष्ट्र आंत्रप्रेन्यूअर चेंबरचे अध्यक्ष अमेय पाटील, 'नॅशनल इंटिग्रेटेड मेडिकल असोसिएशन'चे अध्यक्ष डॉ. विनायक टेम्भूर्णीकर, डॉ. भारती मोटवानी, राज्य शासनाचे सहसचिव सतीश जोंधळे व पुरस्कार विजेत्या संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी राज्यपालांच्या हस्ते 'अध्याय २०२१ कृष्ण महिमा' या गीता पठण व अर्थ निरूपण स्पर्धेतील विजेत्या इरावती वालावलकर, ओमिशा सिंह व आदित्य सुब्रमण्यम या लहान मुलांचा सत्कार करण्यात आला.

### मनोज वराडे 'बेस्ट'चे नवे जनसंपर्क अधिकारी

**मुंबई:** 'बेस्ट' उपक्रमाचे जनसंपर्क अधिकारी म्हणून मनोज वराडे यांची नुकतीच नेमणूक करण्यात आली आहे. वराडे यांनी जनसंपर्क व्यवस्थापन या विषयामध्ये पदव्युत्तर पदविका प्राप्त केली असून, जनसंपर्क विषयामध्ये मुंबई विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी संपादन केली आहे. यापूर्वी 'बेस्ट' उपक्रमाच्या विविध पदांवर त्यांनी काम केले असून, जनसंपर्क विभागामध्ये साहाय्यक जनसंपर्क अधिकारी तसेच, उपजनसंपर्क अधिकारी म्हणूनही वराडे यांनी काम केले आहे. 'बेस्ट' उपक्रमाचे अधिकृत फेसबुक पेज आणि 'ट्विटर हँडल' सुरू करण्याकरिता त्यांनी प्रयत्न केले आहेत.



### अग्निशमन सेवा सप्ताहानिमित्त 'राणी बाग'मध्ये १७ एप्रिल रोजी प्रदर्शन

**मुंबई :** मुंबई अग्निशमन दलाचा १४ एप्रिल हा दिवस 'अग्निशमन सेवा दिनाच्या निमित्ताने १४ ते २० एप्रिल सप्ताह 'अग्निशमन सेवा सप्ताह' म्हणून साजरा होणार आहे. अग्निशमन दलाचे प्रमुख अग्निशमन अधिकारी हेमंत परब यांनी अग्निशमन सेवा सप्ताह दिनानिमित्त मुंबईकरांना अग्निशमन दलाची ओळख प्रत्यक्षात करून देण्याचे कार्यक्रम आखले आहेत. दलाच्या कामकाजासोबत आगीपासून संरक्षण करण्यासाठी कोणती उपाययोजना केली पाहिजे, काय करावे आणि काय करू नये याची माहिती दिली जाणार आहे. अग्निशमन दलाचा इतिहास व त्यांच्या कामकाजाची माहिती आणि उपकरणे यासंबंधीचे प्रदर्शन दलातर्फे राणीबागमध्ये १७ एप्रिल रोजी भरवण्यात येणार आहे. आग शमवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले जातात. परंतु, आग कशी शमवली जाते, अग्निशमन दलाला आग लागल्याचा फोन आला की, दलाची यंत्रणा कशी कार्यान्वित होते, यासंबंधीची माहिती प्रत्यक्षात मिळणार आहे.

# गावडे रुग्णालय घशात घालण्याच्या हालचाली; सामाजिक कार्यकर्त्यांचा आरोप

**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) :** ''विलेपार्ले पूर्वमधील पालिकेच्या राखीव भूखंडावर उभे असलेले बाबासाहेब गावडे रुग्णालय येत्या काही दिवसांमध्ये खासगी संस्थांच्या हातात देण्यात येणार असून त्यासाठी आवश्यक त्या हालचालीदेखील आता सुरू झाल्या आहेत. प्रशासनासोबत करण्यात आलेल्या कराराचे कुठल्याही प्रकारचे पालन येथे करण्यात येत नसून हे रुग्णालय संबंधित संस्थेच्या घशात घालण्याचा हा प्रकार आहे,'' असा आरोप सामाजिक कार्यकर्ते आणि महाराष्ट्र सरकारचे विशेष कार्यकारी अधिकारी सदानंद साटम यांनी केला आहे.



**रुग्णालय आवारातील बांधकामे अनधिकृत**

''सदरील रुग्णालयाचे बांधकाम सुरू होण्यापूर्वीच या ठिकाणी दोन दुकाने बांधण्यात आलेली आहेत. सुमारे २० वर्षांपासून या इमारतीतील तळमजल्यावर औषधी विक्री दुकानाच्या जागेवर एक व्यावसायिक गाळा असून तो पूर्णतः बेकायदेशीररित्या उभा आहे. मात्र, बेकायदेशीररित्या उभारलेल्या या गाळ्याचे भाडे कुणाकडे जाते, याचे उत्तर अद्याप मिळालेले नाही. तसेच, याच ठिकाणी आणखी एक दुकान असून ते देखील बेकायदशीर आहे,'' असा आरोप साटम यांनी केला असून त्याबाबत आपण प्रशासनाकडे तक्रार देखील नोंदवल्याचे साटम यांनी म्हटले आहे.

बैंक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
A GOVT. OF INDIA UNDERTAKING
एक परिवार एक बैंक
**मुख्य कार्यालय :** लोकमंगल, १५०१, शिवाजीनगर, पुणे-४११ ००५, महाराष्ट्र

**ग्राहकांना सूचना**

बँकेची सुधारित सेवा शुल्क आकारणी **०१.०५.२०२२** पासून लागू होणार आहे. ग्राहकांच्या माहितीसाठी सुधारित सेवा शुल्क आमच्या वेबसाइटवर अपलोड केले आहे. अधिक माहितीसाठी कृपया आमच्या **www.bankofmaharashtra.in** या वेबसाइटला भेट द्या.

# पश्चिम उपनगरांतील नाल्यांचे चित्र भयावह

## आ. ॲड. आशिष शेलार यांचे प्रतिपादन

**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) :** भाजपचे नेते आमदार ॲड. आशिष शेलार यांच्या नेतृत्वात भाजपच्या स्थापना दिनाचे औचित्य साधत गुरुवारपासून नालेसफाईच्या कामाचा पाहणी दौऱ्याला सुरुवात झाली आहे. शुक्रवार, दि. ८ एप्रिल रोजी पश्चिम उपनगरातील नालेसफाईच्या कामांची पाहणी करताना, इथले सध्याचे चित्र भयावह असल्याची चिंता आ. ॲड. आशिष शेलार यांनी व्यक्त केली. सांताक्रुज, खार येथील गजर बांध येथील आणि तेथील नाल्यांची परिस्थिती पाहता भाजपने आक्रमक भूमिका घेतल्याने प्रशासन आणि कंत्राटदार यांची चांगलीच तारांबळ उडाली.



दरवर्षी मार्च अखेरीस सुरू होणारी नालेसफाईची कामे एप्रिलचा पहिला आठवडा संपत आला, तरी अद्याप सुरू झाली नाहीत. काही ठिकाणी तुरळक कामे सुरू झाली आहेत. शुक्रवारी विलेपार्ले पूर्व, जुहू, वर्सोवा, गोरेगाव येथे पाहणी करण्यात आली. मोगरा नाला, गोरेगाव शास्त्रीनगर नाला, भगतसिंग नगर येथील नाल्यांची पाहणी करण्यात आली. सर्वच नाल्यांमध्ये प्रचंड गाळ तसाच पडून असून, कचऱ्यांचे ढीग, प्लास्टिकच्या पिशव्या आढळल्या. ''अवघा दीड महिन्याचा कालावधी आता शिल्लक असून दीड महिन्यात ही साफसफाई होईल का,'' असा सवाल करत ''यावर्षी दरवर्षीपेक्षा अधिक भयानक पूर परिस्थितीला मुंबईकरांना सामोरे जावे लागणार आहे,'' याबाबत ॲड. आशिष शेलार यांनी चिंता व्यक्त केली.

शुक्रवारी नालेसफाई पाहणी दौऱ्यात आ. अमित साटम, भाजपचे पालिकेतील गटनेते प्रभाकर शिंदे, विनोद मिश्रा, प्रवक्ते भालचंद्र शिरसाट, नगरसेवक अनिश मकवानी, सुधा सिंग, रेणू हंसराज, योगिराज दाभाडकर, रंजना पाटील, हर्ष पटेल, संदीप पटेल, दीपक ठाकूर, श्रीकला पिल्ले आदी स्थानिक नगरसेविका, नगरसेवक सहभागी झाले होते. शनिवारी, मुलुंड ते घाटकोपर दरम्यान नालेसफाई पाहणी दौरा करण्यात येणार आहे.

इंडियन बैंक Indian Bank
इलाहाबाद ALLAHABAD
**खारघर सेक्टर ६ शाखा:** दुकान क्र. ११-१५, शाह कॉर्नर प्लॉट क्र. ८ए, सेक्टर ०६, खारघर, नवी मुंबई - ४१०२१०. **दूर.:** ०२२-२७७४७७४७ • ईमेल: k691@indianbank.co.in

**अलंकार लिलाव सूचना**

निम्न उल्लेखित कर्जदारांना त्यांची **इंडियन बँक, खारघर शाखेकडून** प्राप्त केलेल्या सुवर्ण अलंकाराच्या तारणावर घेतलेल्या सुविधेवरील थकबाकी रक्कमेचा परतावा करण्याकरिता सूचना पारित केल्या होत्या. कर्जदार सुविधेअंतर्गत असलेली देणी परतावा करण्यास अयशस्वी ठरल्याने, आम्हाला तारण सुवर्ण अलंकारांचा **दि. १८.०४.२०२२** रोजी लिलाव आयोजित करण्यास भाग पडत आहे. इंडियन बँकेस पूर्व सूचनेशिवाय लिलाव मागे घेण्याचे अधिकार आहेत. पुढे, इंडियन बँकेकडे कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय लिलाव दिनांक बदलण्याचे अधिकार राखीव आहेत.

- **खाते क्रमांक: ५०५१२१७९९०४**
- **कर्जदाराचे नाव: सौ. पारुल लाखिना**
- **एकूण वजन: ४८३.५६ ग्रॅम्स**

लिलाव **दि. १८ एप्रिल, २०२२ रोजी सायं. ०४.००** वाजता आयोजित केला जाईल. अधिक माहितीकरिता खरेदीदारांनी **इंडियन बँक, खारघर सेक्टर ६ शाखा, दूर.-०२२-२७७४७७४७** येथे संपर्क साधावा.

**ठिकाण:** मुंबई
**दिनांक:** ०८.०४.२०२२

सही/-
**शाखा व्यवस्थापक, खारघर शाखा**

# महापालिका रुग्णालयांत 'सर्जिकल ड्रेसिंग'चा तुटवडा

## ७ मार्चच्या सभेत निर्णय न झाल्याचा परिणाम

**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी):** मुंबई महापालिकेची रुग्णालये, दवाखाने, प्रसूतिगृहांमध्ये गेल्या काही दिवसांपासून 'सर्जिकल ड्रेसिंग'चा तुटवडा भासत असल्यामुळे रुग्णांच्या नातेवाईकांना बाहेरून 'ड्रेसिंग' आणावे लागत आहे. गेल्या ७ मार्च रोजी स्थायी समितीच्या सभेत सर्जिकल ड्रेसिंग खरेदी करण्याच्या प्रस्तावावर निर्णय झाला नसल्यामुळे 'ड्रेसिंग'चा तुटवडा भासत आहे.

१८ फेब्रुवारी रोजी 'सर्जिकल ड्रेसिंग'चा प्रस्ताव स्थायी समितीपुढे मंजुरीसाठी मांडला होता. मात्र, सत्ताधारी शिवसेना पक्ष आणि प्रशासनानेही त्याला संमती दिली नाही. रुग्णालये, दवाखाने, प्रसूतिगृहांमध्ये महत्त्वाच्या अशा 'सर्जिकल ड्रेसिंग'चा पुरेसा साठा नव्हता का, असाही प्रश्न उद्भवला आहे. परिणामी नातेवाईकांना हे साहित्य खासगी केमिस्टकडून आणावे लागत आहे. सर्जिकल 'ड्रेसिंग' साहित्याचे कंत्राट कोरोनापूर्वी संपुष्टात आले होते. नव्या कंत्राटदारांची नियुक्ती न झाल्यामुळे निविदा मागवली. पण, मार्च २०२० मध्ये कोरोना फैलावला आणि निविदा रखडली होती. 'कोविड' ओसरल्यानंतर निविदा प्रक्रिया पूर्ण करून, रुग्णालये, प्रसूतिगृहे व दवाखान्यांच्या प्रमुखांना स्थानिक पातळीवर खरेदीचे अधिकार दिले होते. त्यानंतर 'सर्जिकल ड्रेसिंग' तात्पुरते खरेदी करण्यात आले होते.

''स्थायी समितीच्या चार बैठकांमध्ये या प्रस्तावावर कधीच चर्चा झाली नाही आणि अखेरच्या ७ मार्च रोजी झालेल्या सभेतही यावर निर्णय झाला नाही. यामुळे हा प्रस्ताव प्रशासकाच्या मंजुरीसाठी गेल्या महिन्यांपासून प्रलंबित आहे. रुग्णालयांमध्ये 'सर्जिकल ड्रेसिंग'चा प्रचंड तुडवडा असून अखेर डॉक्टर मंडळीही रुग्णांच्या नातेवाईकांना हे साहित्य बाहेरून आणण्यास भाग पाडत आहेत.

सध्या पालिका रुग्णालये आणि 'जम्बो कोविड सेंटर'मधील आरोग्य सेवकांच्या वापरासाठी लिक्विड मेडिकल ऑक्सिजनचा तसेच, रुग्णालयांतील हॅण्ड सॅनिटायझरचा पुरवठाही होत नाही, असे कळते. प्रशासकाच्या मंजुरी अभावी ही खरेदी रखडली आहे. सत्ताधारी शिवसेना पक्षाने त्यांच्या सोईचे प्रस्ताव संमत केले. मात्र, आरोग्य साहित्याच्या पुरवठ्याच्या निविदांचा काहीच विचार केला नाही. प्रशासक हे प्रस्ताव मंजूर कधी करणार,'' असा प्रश्न दवाखान्यांतील, रुग्णालयांतील परिचारिकांना पडला आहे.

# धारावीत नागरी सुरक्षा वाऱ्यावर : मणी बालन




**मुंबई, दि. ८ (प्रतिनिधी) :** ''धारावीच्या काळा किल्ला परिसरातील संत रोहिदास मार्गावर महापालिकेतर्फे मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरू असून, त्या ठिकाणी सिमेंटसह लोखंडी सळ्या आणि इतर काही साहित्य ठेवण्यात आलेले आहे. मात्र, त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे सुरक्षा कुंपण अथवा सुरक्षेचे कुठलेही उपाय योजण्यात आलेले नाहीत, असे आढळून आले असून त्या परिसरात वावरणाऱ्या नागरिकांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे चित्र आहे,'' अशी टीका मुंबई भाजपचे सचिव मणी बालन यांनी केली आहे.

''सदरचा मार्ग हा विभागातील नागरिकांच्या रहदारीचा आणि दररोजच्या वापरातील असून, अशाप्रकाराचे साहित्य इथे ठेवल्यामुळे संबंधितांच्या जीविताला धोका उत्पन्न होऊ शकतो. रोहिदास मार्गावर होत असलेल्या या बांधकामात संबंधित अधिकारी आणि कंत्राटदार यांचे वर्तन निष्काळजीपूर्ण असून त्यांच्यावर आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी,'' अशी मागणी देखील मणी बालन यांनी प्रशासनाकडे केली आहे.

**इन्नोवासिन्थ इन्व्हेस्टमेन्ट्स लिमिटेड**
नोंद. कार्यालय: सदनिका क्र. सी-२/३, केएमसी क्र. ९१, इन्नोवासिन्थ कॉलनी, खोपोली - ४१०२०३, महाराष्ट्र, भारत
CIN: L67120MH2008PLC178923
दूरध्वनी : +९१-२१९२-२६०२२४ फॅक्स: +९१-२१९२-२६३६२८.
वेबसाईट : www.innovassynthinvestments.in
ईमेल: secretarial@innovassynthinvestments.in

**टपाली मतदानाची सूचना**

याद्वारे **सूचना** देण्यात येते की, कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियमन, २०१४ च्या नियम २० आणि नियम २२ (त्या काळापुरते लागू असलेल्या कोणताही वैधानिक सुधारणा किंवा पुनर्कायदा समाविष्ट) ("नियमन"), सिक्युरिटीज ॲण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सुचिबद्धता दायित्वे आणि प्रकटीकरण आवश्यकता) विनियमन, २०१५ ("सूचिबद्धता विनियमन"चे विनियमन ४४), कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, भारत सरकार द्वारे पारित ("एमसीए परिपत्रके") सर्वसाधारण परिपत्रक क्र. १०/२०२१ दिनांक २३ जून, २०२१ आणि २०/२०२१ दिनांक ८ डिसेंबर, २०२१ समाविष्ट असलेल्या इतर संबंधित परिपत्रकांसह वाचावयाच्या सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांक ८ एप्रिल, २०२० आणि १७/२०२० दिनांक १३ एप्रिल, २०२०, इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाद्वारे पारित सेक्रेटरीयल स्टॅण्डर्ड ऑन जनरल मीटिंग्ज ("एसएस-२") आणि इतर कोणतेही लागू कायदे, नियमन आमि विनियमन (त्या काळापुरते लागू असलेल्या कोणताही वैधानिक सुधारणा किंवा पुनर्कायदा समाविष्ट) सह वाचावयाच्या कंपनी कायदा, २०१३ ("कायदा") (त्या काळापुरते लागू असलेल्या कोणताही वैधानिक सुधारणा किंवा पुनर्कायदा समाविष्ट) च्या कलम १०८ आणि ११० आणि इतर लागू तरतुदी, जर असल्यास, अनुसार, टपाली मतदान सूचनेमध्ये ("टपाली मतदान सूचना") नमूद केल्यानुसार व्यवसायाचे कामकाज करण्याकरिता फक्त दुरस्थ ई-मतदान प्रक्रियेद्वारे, टपाली मतदानामार्फत सदर ठरावाच्या मंजुरीद्वारे इन्नोवासिन्थ इन्व्हेस्टमेन्ट्स लिमिटेडच्या सदस्यांची मंजुरी मिळविण्याकरिता.

तुमच्या कंपनीच्या संचालक मंडळाने मिकेत एस. बहुवा आणि कं., प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरीज, मुंबई च्या श्री. मिकेत शशिकांत बहुवा (सदस्यता क्र. एफसीएस ७६५१) यांटी टपाली मतदान आणि ई-मतदान प्रक्रिया आयोजित करण्याकरिता स्क्रुटिनायझर म्हणून नियुक्ती केली आहे.

कंपनीने त्यांच्या सदस्यांना दूरस्थ ई-मतदान सुविधा प्रदान करण्याकरिता नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("एनएसडीएल") ची सेवा घेतली आहे. दूरस्थ ई-मतदान शनिवार, दि. ९ एप्रिल, २०२२ रोजी स. ०९.०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि रविवार, दि. ८ मे, २०२२ रोजी सायं. ५.०० वा. (भाप्रवे) समाप्त होईल. दूरस्थ ई-मतदान यंत्रणा त्यानंतर एनएसडीएलनंतर अकार्यक्षम करण्यात येईल. सदस्याने एकदा ठरावावर मत दिल्यानंतर, त्याला/तिला ते बदलता येणार नाही किंवा पुन्हा मत देता येणार नाही.

सभेची सूचना कंपनीच्या वेबसाईटवर म्हणजेच www.innovassynthinvestments.in वर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("एनएसडीएल")च्या वेबसाईट www.evoting.nsdl.com वर आणि स्टॉक एक्सचेंज, जेथे कंपनीचे समभाग सूचिबद्ध आहेत, म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या वेबसाईट www.bseindia.com वर उपलब्ध आहे.

टपाली मतदान सूचना त्या पात्र सदस्यांना ज्यांनी यापूर्वीच त्यांचे ई-मेल पत्ते डिपॉझिटरीज / त्यांचे डिपॉझिटरी पार्टिसिपन्ट / कंपनीचे निबंधक आणि भाग हस्तांतरण एजन्ट यांच्याकडे कट-ऑफ दिनांक सोमवार ४ एप्रिल, २०२२ रोजीपर्यंत नोंदणीकृत केले आहेत, त्यांनाई-मेल द्वारे पाठविण्यात आली आहे.

टपाली मतदान आणि ई-मतदानाचा निकाल मंगळवार, दि. १० मे, २०२२ रोजी किंवा त्यापूर्वी जाहीर करण्यात येईल. सदर निकाल कंपनीचे समभाग जेथे सूचिबद्ध आहेत त्या बीएसई लिमिटेडला सूचित केल्यानंतर कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयातील सूचना फलकावर उपलब्ध करून देण्यात येईल. तसेच, निकाल कंपनीची वेबसाईट www.innovassynthinvestments.in वर आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("एनएसडीएल")च्या वेबसाईट www.evoting.nsdl.com वर देखील अपलोड करण्यात येतील. टपाली मतदानाच्या वैधतेवर स्क्रुटिनायझर यांचा निर्णय अंतिम असेल.

कोणत्याही चौकशीकरिता, सदस्यांनी www.evoting.nsdl.com च्या डाऊनलोड विभागामध्ये उपलब्ध भागधारकांकरिता वारंवार विचारले जाणारे प्रश्न (एफएक्यूज) आणि भागधारकांकरिता ई-मतदान वापरकर्ता पुस्तिकाचा संदर्भ घ्यावा किंवा टोल-फ्री क्र.: १८०० १०२० ९९० /१८०० २२४ ४३० येथे दूरध्वनी करावा किंवा evoting@nsdl.co.in येथे विनंती पाठवावी.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
**इन्नोवासिन्थ इन्व्हेस्टमेन्टस लिमिटेड** करिता
**समीर पखाली**
मुख्य वित्तीय अधिकारी आणि कंपनी सचिव
एसीएस ५५७४६

दिनांक: ६ एप्रिल, २०२२
ठिकाण: खोपोली